महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्रमांक मऔविम/सह मु.का.अ. (आय.टि/ ४०5

मरोळ औद्योगिक क्षेत्र
उद्योग सारथी
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पुर्व),
मुंबई-४०० ०९३
दिनांक 6/7/04

## परिपत्रक

विषय :- मिलेनियम बिझनेस पार्क, महापे, नवी मुंबई येथील तयार गाळयांचे विक्रीचे / वाटपाचे दर कमी करणेबाबत .........

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दिनांक ९ जुन २००४ रोजी झालेल्या २८९ व्या सभेत ठराव क्रमांक ३८९३ अन्वये मिलेनियम बिझनेस पार्क, महापे, नवी मुंबई येथील बांधण्यात आलेल्या तयार गाळयांच्या विक्रीचा / वाटपाचा दर रु.१२५०/- प्रति चौ.फुट व तळघराच्या (बेसमेंट) विक्रीचा/ वाटपाचा दर रु.८००/- प्रति चौ.फुट असा करण्यात आलेला आहे. तथापि वरील दर फक्त जे उद्योजक माहिती व तंत्रज्ञान विषयक उद्योगांकरिता संपूर्ण एक इमारत अथवा कमीत कमी सुमारे ४०,००० ते ५०,००० चौ.फुट क्षेत्रफळाच्या क्षेत्राची खरेदी करतील अशा उद्योजकांनाच सदर दर लागु राहील.

वरील विक्रीचे/वाटपाचे सुधारित दर हे ९ जुन २००४ या तारखेपासून पुढील ६ महिन्यासाठीच अनुज्ञेय राहतील. या निर्णयाची नोंद संबधितांनी घ्यावी.

( भूषण गगराणी )
सह मुख्य कार्यकारी अधिकारी ( मा. व तं )
मऔविम, मुंबई-९३

प्रति
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई यांना सविनय सादर.
प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी
१) सर्व विभाग प्रमुख , मऔविम, मुंबई
२) मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/ अति.मुख्य अभियंता, मऔविम, नागपुर
३) जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई
४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
५) व्यवस्थापक भूमी, मऔविम, मुंबई
६) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
७) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.